# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

## Criterion IV – Infrastructure and Learning Resources

### Key Indicators – 4.1 Physical Facilities

| Metric No. | |
|---|---|
| **4.1.2**<br><br>**QlM** | ***The institution has adequate facilities for cultural activities, yoga, games (indoor, outdoor) and sports. (gymnasium, yoga centre, auditorium, etc.)***<br><br>**File Description**<br><br>Upload relevant supporting document |

# Main Auditorium Hall






## Open Hall (For Cultural Activity)





## School of performing arts and fine arts Hall






***The institution has adequate facilities for cultural activities, yoga, games(indoor, outdoor) and sports. (Gymnasium, Yoga Centre, Auditorium, etc.)***

| Sr. No | Facilities | Numbers | Year of Establishment | Area |
|---|---|---|---|---|
| 01 | Track and field | 01 | 2019 | 400 mts. running Track - 8 Lane |
| 02 | Basket Ball Court Flood light | 02 | 2019 | 15 m X 28 m |
| 03 | Kho-Kho Ground | 04 | 2019 | 95 ft X 52 ft |
| 04 | Kabaddi Ground | 04 | 2019 | 16m. X 13m. |
| 05 | Volley Ball Ground | 04 | 2019 | 9m. X 18m. |
| 07 | Hand Ball Grounds | 04 | 2019 | 20 m X 40 m<br>Situated at Sinhgadh Institution of Technology, Kegaon Solapur |
| 08 | Multipurpose Hall | 01 | 2020 | Ongoing |

Director
Sports & Physical Education
Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur

## RUNNING TRACK



## IRON SHOT PUT BALL GROUND



**LONG JUMP GROUND**




**BASKET BALL GROUND**






## HAND BALL GROUND





## VOLLEY BALL GROUND







## KHO-KHO GROUND








**KABADI GROUND**




5







**Open Stage**


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
PRCR+Q48, Kondi, Maharashtra 413255, India
214°
27/04/2023 09:01:51 AM

**Yoga Hall**


MW85+9CH, Solapur, Maharashtra 413001, India
200°
28/04/2023 12:09:03 PM


MW85+9CH, Solapur, Maharashtra 413001, India
28/04/2023 12:09:26 PM

**Hostel**


व्यायामशाळा
Kegav, Shop No.08, Maharashtra 413255, India
121°
27/04/2023 09:23:37 AM


Kegav, Shop No.08, Maharashtra 413255, India
86°
27/04/2023 09:23:47 AM


Computer Room
Kegav, Shop No.08, Maharashtra 413255, India
287°
27/04/2023 09:24:08 AM


Kegav, Shop No.08, Maharashtra 413255, India
190°
27/04/2023 09:24:17 AM

**राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३"**

**दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३**

| अ.क्र. | उत्कर्ष महोत्सव अहवाल |
|---|---|
| १ | राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" चे दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठात संपन्न झाला आहे. |
| २ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" महाराष्ट्रातून एकूण १३ विद्यापीठ सहभागी झाले होते. सदरच्या महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या विविध विद्यापीठांमधून एकुण २५० रासेयो स्वयंसेवक / स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. |
| ३ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरात उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचे मा. डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, प्र- कुलगुरू मा. डॉ. राजेश गादेवार, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्य ब्रँड अँबेसिडर (सदिच्छा दूत) प्रिया पाटील, कुलसचिव योगिनी घारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे व उत्कर्ष समन्वयक तथा संचालक विद्यार्थी विकास विभाग डॉ. केदारनाथ काळवणे यांच्या उपस्थितीत शोभायात्रेने प्रारंभ झाला. |
| ४ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरच्या विद्यार्थ्यांनी आजादी का अमृत महोत्सव या विषयावरती भारतामधील दिग्गज व्यक्तीमत्त्वाचे, कलाकारांचे पोशाख परिधान करून शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| ५ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाने वाघ्या मुरळी, वारकरी, धनगरी कला, लावणी, लोककला तसेच कलाकारांचे जीवन कसे असते व संस्कृती कलेवर कशी जिवंत आहे याचे शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| ६ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी अवयव दान हेच श्रेष्ठदान या विषयावर अस्सल महाराष्ट्रीयन पेहराव परिधान करून संबळ, ढोलक व टाळ वाजवून बॅनरसह शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| ७ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या एचएसएनसी मुंबई विद्यापीठ, मुंबईने एकता |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur

| | |
|---|---|
| | आणि विविधता या विषयावर वेगवेगळया धर्माचा पोशाख परिधान केला होता. त्यामधून भारत देशामध्ये वेगवेगळया जातीचे व धर्माचे लोक राहत असून सुध्दा आपल्यामध्ये बंधुत्व दिसून येते याची घोषवाक्यांसह शोभायात्रेमध्ये सादरीकरण करून उपस्थितांना त्याची जाणीव करून दिली आहे. |
| ८ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाने महाराष्ट्र हे संताची भूमी असलेले राज्य आहे. यामध्ये विठ्ठल रूक्मिणीचे पात्र साकारून मृदंग, टाळ, ओव्या याचे गायन करून शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| ९ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाने स्त्री शक्तीचा विजय असो, एक नारी सर्वात भारी असं म्हणत शाहीर हा महाराष्ट्राचा प्राण हा पोवाडयाचे शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| १० | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने अवयव दान हेच श्रेष्ठदान हा सामाजिक संदेश देत माणसांच्या दैनंदिन जीवनात आरोग्य किती महत्वाचे असून शरीराचा प्रत्येक अवयव किती महत्वाचा आहे याबाबत शोभायात्रेमध्ये सादरीकरण केले. |
| ११ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाने पोतराजाच्या माध्यमातून संविधान वचाव हा संदेश दिला. देशाची लोकशाही वाचविताना संविधान बाचविणे अत्यंत महत्वाचे आहे संविधान वाचले नाही तर इथली लोकशाही संपेल व अराजकता निर्माण होईल असा संदेश पोतराजाचे वेश परिधान करून अंगावर आसुडाचे फटके ओढून घेतले. |
| १२ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाने खानदेशी संस्कृतीचे सादरीकरण केले. यामधून ताशा, मृदंग, ढोल असे पारंपारिक वाद्ये वाजवत खानदेशी पेहराव परिधान करून सादरीकरण केले. |
| १३ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या विद्यापीठ संघाने विविधेतून एकता या विषयावर विविध धर्म, विविध प्रांत, आणि विविध भाषा असूनही देश एकसंघ टिकून आहे त्यावर घोषणा देत बॅनरसह सादरीकरण केले. |
| १४ | सदरच्या महोत्सावामध्ये सहभागी झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या संघाने बालविवाह या सामाजिक प्रश्नावर परखड भाष्य करणारे सादरीकरण केले. |
| १५ | सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव “उत्कर्ष महोत्सवाचे उद्घघाटन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. विकास चंद्र रस्तोगी यांच्या हस्ते कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणवीस, प्रभारी प्र- कुलगुरू मा. डॉ. राजेश गादेवार, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्य ब्रँड अँबेसिडर (सदिच्छा दूत) प्रिया पाटील, कुलसचिव योगिनी घारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur ★

| | |
|---|---|
| | डॉ. गुणवंत सरवदे व उत्कर्ष समन्वयक तथा संचालक विद्यार्थी विकास विभाग डॉ. केदारनाथ काळवणे यांच्या उपस्थितीत ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाला. |
| १६ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये लोककला, संकल्पना नृत्य, लोकवाद्य, समूहगीत, निबंध, काव्यवाचन, वक्तृत्व, पथनाटय यासारख्या विविध स्पर्धेत एकुण १३ विद्यापीठे सहभागी झाले होते. |
| १७ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये भारतीय लोककला या कलाप्रकाराचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. यामध्ये भारूड, भजन व पोवाडा हे कलाप्रकार सादर करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील लोककलेतून सामाजिक संदेश देणा-या कला सादर करण्यात आल्या. सादरीकरणात एकूण १२ विद्यापीठांनी आपली कला सादर केली. सदर सादरीकरणात सामाजिक संदेश देणारे पोवाडे देखील सादर करण्यात आले आहेत. |
| १८ | गोंडवाना विद्यापीठ, गोंडवाना या विद्यापीठाने अंधश्रध्दा या विषयांवर भारूडाचे सादरीकरण केले यामध्ये समाजात अंधश्रध्दा दिसून येत आहे. त्याचे निर्मुलन व्हावे याबाबत या सादरीकरणातून सामाजिक संदेश देण्यात आला. |
| १९ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी आपला कलाप्रकार सादर केला, या सादरीकरणामुळे पुर्ण वातावरण हे भक्तीमय झाले होते. चला चला पंढरी, विठ्ठल नामाचा जागर करत हे सादरीकरण करण्यात आले. भक्तीमय वातावरणानंतर अंगावर काटे आणणारा आणि समाजातील सामाजिक समस्या विषयी प्रबोधन करणारे जागरण गोंधळ ही सादर करण्यात आले. |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी स्त्रीयांच्या व्यथा सादरीकरणातून मांडल्या. स्त्री-पुरूष समानता म्हणून आपण मिरवतो परंतु आजही स्त्रियांना गौण स्थान दिले जाते. स्त्रीयांवर होणारे अन्याय स्त्री-भ्रूण हत्या आणि महिला सक्षमीकरण हया विषयी त्यांनी आई जगदंबेकडे जागरण गोंधळाच्या माध्यमेतून साकडे घालत सादरीकरण केले. |
| २१ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाने क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जीवनावर पोवाडा सादर केला. |
| २२ | प्रस्तुत विद्यापीठाच्या संघाने समाज प्रबोधनपर भजन व गीत सादर केले. |
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विद्यापीठाने जनजागृतीपर भजनाचे सादरीकरण केले. |
| २४ | मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी प्रताप गडावरील अफझल खानाचा वध यावर सविस्तर वर्णनात्मक पोवाडा सादर करण्यात आला. |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

| | |
|---|---|
| २५ | एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई यांनी महर्षि कर्वे यांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला. समाजातील वंचित घटकांसाठी सुरू करण्यात आलेली शाळा व सामाजिक प्रश्नांवर केलेल्या कार्यावर सदरचे सादरीकरणे केले. |
| २६ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी जाई नाचत नाचत पंढरी या गीतातून विठ्ठल नामाचा गजर केला. सदरच्या सादरीकरणास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. |
| २७ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी भजन सादर केले. वेडा वेडा रे पंढरी या गीताने संपूर्ण वातावरण मंत्रमुग्ध झाले. |
| २७ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाने जगी जीवनाचे सार जाणूनी घे रे ईश्वर या विठ्ठलाच्या भजनाचे सादरीकरण केले. |
| २८ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये भारतीय लोकवाद्यांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. यामध्ये एकुण ११ विद्यापीठ संघानी सहभाग नोंदविला होता. यामध्ये तबला, ढोल, संबळ, हलगी, बासरी, गजीढोल ही वाद्ये वाजविण्यात आली. |
| २९ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाने तबला अणि पखवाज वाजवून सादरीकरण करण्यात आले. व चक्रताल या तालामध्ये तबल्याचे सादरीकरण करण्यात आले. |
| ३० | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाने संबळ, हलगी, ढोलकी, हार्मोनियम, चवंडके, दिमडी, गजीढोल, झांज या वाद्यांचा वापर करत आपले सादरीकरण केले. |
| ३१ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाने पखवाज व हार्मोनियम यांच्या जुगलबंदीच्या माध्यमातून आपले सादरीकरण केले. |
| ३२ | प्रस्तुत विद्यापीठाच्या संघाने सूरपेटी, ढोलकी, पखवाज, संबळ, झांज, दिमडी, कुडमुडे, शंख, टाळ, डफ या पारंपरिक वाद्यांचा सुंदर मिलाप करून आपले सादरीकरण केले. |
| ३३ | मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाने ढोलकी, पखबाज, गजी ढोल या वाद्यांचा सुरेख वापर करत सादरीकरण करून कार्यक्रमामध्ये रंगत आणली. |
| ३४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाने बनारस फोक धून, ढोलकी व बासरी यांच्या मंजुळ मिलापाने सादरीकरण केले. |
| ३४ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या विद्यापीठाने हार्मोनियम, तबला, ढोल, पखवाज, हलगी, संबळ या विविध वाद्यांचा वापर करून सादरीकरण केले. |
| ३५ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाने हलगी व ढोल या वाद्यांचा सुरेख वापर करून सादरीकरण केले. |
| ३६ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने पखवाज व तबला या |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur ★

| | |
|---|---|
| | वाद्यांचा सुरेख वापर करून सादरीकरण केले. |
| ३७ | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या विद्यापीठाने हार्मोनियम, ढोलकी व टाळ या या वाद्यांचा सुरेख वापर करून सादरीकरण केले. |
| ३८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाने दिमडी, टाळ, ढोलकी, पखवाज, नगाडा यांचा वापर करत भारतीय लोकवाद्य परंपरेचे सादरीकरण केले. |
| ३९ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव “उत्कर्ष २०२२-२३” मध्ये संकल्पना नृत्यातून सामाजिक सुधारणेचा आरसा यावर बहारदार सादरीकरण करण्यात आले. यामध्ये एकुण १३ विद्यापीठ संघानी सहभाग नोंदविला होता. यामध्ये महिला सक्षमीकरण, गड संवर्धन, एका मातेच्या हिरणीची कथा, तृतीयपंथीय यांच्या जीवन व्यथेतील नृत्य, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामाचे गौरव गीत, स्त्रीभ्रूण हत्या, भरतनाटय, लावणी असे विविध संकल्पना नृत्यप्रकार सादर करण्यात आले. |
| ४० | एच. एस. एन. सी. विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाने मलुक्का छुप्पी बहुत हुई सामने तो आना या गाण्यावर भरतनाटय नृत्य सादर केले. |
| ४१ | प्रस्तुत विद्यापीठ संघाने स्त्रीभ्रूण हत्या, मुली वाचवा, मुलींना शिकवा असा संकल्पना नृत्यातून संदेश दिला. |
| ४२ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाने मनाजूक की नार कशी चाफेकळीफ या लावणी माध्यमातून नृत्यकला सादर केले यामधून महिलांचे जीवन कसे कष्ट दायक आहे व त्यास ते कसे सामोरे जातात हे त्यांनी अभिनयातून स्पष्ट केले. |
| ४३ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाने मुलांसाठी आपलया आईचा जीव कसा कासावीस होतो आणि मातृप्रेमासाठी एका आईने आपल्या मुलासाठी गड उतरला अशा हिरकणीची कथा त्यांनी आपल्या नृत्यातून दाखविली. तलवार, लेझीम, दानपट्टा इत्यादी साहित्याचा वापर करून आपल्या अभिनयाला जोड दिली. इथला प्रत्येक दगड म्हणजे गड आहे. असा संदेश देण्यात आला. |
| ४४ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाने ज्वलनशील हल्ल्याने पीडित झालेल्या मुलीची व्यथा अभिनयातून दाखवण्यात आली. |
| ४५ | मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाने भरतनाटयम या नृत्यातून नदीचे महत्तव विशद केले. नद्यांचे महत्त्व, त्याचबरोबर नद्या कशा पध्दतीने स्वच्छ राहतील तसेच नद्या दूषित होण्यापासून कसे वाचता येईल आणि गंगा नदीचे पावित्र्य दाखवण्यात आले. |
| ४६ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या विद्यापीठाने देशामध्ये रासेयोचे जाळे कसे पसरत आहे. रासेयोच्या कार्यावर आधारित लावणी नृत्याव्दारे सादर केले. |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

| | |
|---|---|
| ४७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाने शृंगार हा केवळ स्त्रियांसाठीच वरदान नव्हे तर तृतीय पंथीयासाठीही वरदान आहे. तृतीयपंथी संध्याकाळी लोकांकडून जे पैसे मागतात त्यावेळी नागरिकांकडून त्यांना विरोध किंवा चेष्टा केली जाते व त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते समाजामध्ये तृतीयपंथी यांना देखील नागरिकांप्रमाणेच सन्मान मिळावा यासाठी त्यांचा संघर्ष व एक प्रकारची यावेळी अभिनयातून त्यांनी मागणीच केली आहे. |
| ४८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाने स्त्रीच्या जन्माची कथा, व्यथा व गाथा त्यांनी अभिनयातून साजरी केली स्वावलंबी व्हावी तिने जिजाऊ, रमाई व्हावे तसेच स्वतःच्या पायावर उभे राहिला शिकायला पाहिजे. स्त्रियांनी आबला न राहता सबला बनण्याची प्रेरणा दिली. |
| ४९ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाने महिषासुर वर्धनी या गाण्यावर नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांकडून टाळेच्या गजराने तिचे अभिनंदन करण्यात आले. |
| ५० | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या संघाने कोरोना काळामध्ये सामान्य नागरिक घरामध्ये होते परंतु डॉक्टर कोरोनाच्या युद्धात सामील होते. कोरोना रुग्णाला निरोगी करण्यासाठी डॉक्टरांनी कशाप्रकारे कार्य केले हे कौतुकास्पद आहे. कोरोना काळात कोरोना पासून कशाप्रकारे बचाव करावा यामध्ये मास्क, सॅनिटायझर, सुरक्षित अंतर तसेच लसीकरण बाबत जनजागृती संदेश देण्यात आला या सर्व संकल्पना नृत्यातून वेगवेगळ्या सामाजिक, शैक्षणिक संदेशाचे सादरीकरण करण्यात आले. |
| ५१ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये मर्मभेदी कविता सादर करण्यात आल्या. विविध संघांनी सादर केलेलया कवितामधून विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यात आले. यामध्ये एकुण १० विद्यापीठ संघानी सहभाग नोंदविला होता. |
| ५२ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये कार्यप्रसिध्दी अहवालातून वृक्षारोपण, महिला सबलीकरण, नैसर्गिक खतांबाबत प्रबोधन, रक्तदान, अवयवदान, आरोग्य शिबीर, प्लॅस्टिक बंदी, महिला सुरक्षा अशा विविध कार्यक्रमाचा अहवाल यावेळी सादर करण्यात आला होता. यामध्ये एकुण १३ विद्यापीठ संघानी सहभाग नोंदविला होता. |
| ५३ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये समुहगीतांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. समुह गीतांच्या गाण्यावर प्रेक्षकांनी ठेका धरून जल्लोष केला. |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur ★

| | |
|---|---|
| ५४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने चल उठ भारत ही वेळ नसे निजण्याची येळकोट येळकोट जय मल्हार, टाच मारू घोड्याला ही समूहगीते साजरी केली. |
| ५५ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संघाने जय जय महाराष्ट्र माझा हे आदिवासी भाषेतले गाणे गाऊन आपल्या लोक भाषेची झलक दाखवली. शेवटी उलगुलान उलगुलान (जल, जमीन, जंगल) गाणे गायले. |
| ५६ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने जहा डाल डाल पर सोनेकी चिडीया करती है बसेरा व काठी न घोंगड घेऊ द्या की रं मला बी जत्रला येऊ द्या रं हे समूहगीत सादर केले. |
| ५७ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या संघाने हे राष्ट्र देवतांचे, लगबग माझ्या रायाची हे गाणं गाऊन प्रेक्षकांच्या ह्रदयावर एक वेगळीच छाप सोडली. |
| ५८ | शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या संघाने हिंदुस्तान की धरती, गणराया यावे धावून ये समुह गीत ऐकल्यानंतर प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. |
| ५९ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हो जाओ तयार साथियो, गणराया आले धावून ये समूह गीत गायले |
| ६० | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकूर महिला विद्यापीठ, मुंबईने हमारा वतन जान से है प्यारा, शिव अवतारी मार्तंड मल्हारी हे गीत ढोलकी व पांढरा पोशाखाचा जोड देऊन गायले. |
| ६१ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने मेरे वतन के जैसा कोई वतन नही है हे गीत सादर केले. जीव भावान मी जेव्हा पाहिलं, माझ्या गावाचं मंदिर शोभलं हे समुहगीत ऐकून प्रेक्षकांनी टाळ्यांचा गजर केला. |
| ६२ | एच एस एन सी विद्यापीठ मुंबईने जयस्तुते जयस्तुते श्री महान मंगले शिवस्पदे, काठी न घोंगड घेऊ द्या की र मला बी जत्रेला येऊ द्या की हे समूहगीत सादर केले. |
| ६३ | संत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूरने जननी, जन्मभूमी तू, हिंदुस्तान की धरती आणि वंदे मातरम हे पारंपारिक वेशभूषा परिधान करून गीते सादर केली. |
| ६४ | मुंबई विद्यापीठ मुंबईच्या संघाने सोने की चिडिया, है मेरा जहा तुझमे मे है खुदा आणि अंबाबाईच्या नावाने उदो उदो, गारवा, डोंगराची हवा सोसना गारवा हे समूहगीत जोमाने सादर करून प्रेक्षकाचे मने जिंकली. |
| ६५ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव “उत्कर्ष २०२२-२३” मध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युवकाच्या जडणघडणीत विज्ञानाची भूमिका व भारतीय शेती चिंता आणि चिंतन या दोन विषयावर मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेतून स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेसाठी दोन तास कालावधी देण्यात आला होता. निबंधातून भारतीय शेती आणि विज्ञानावर चिंतनशील भाष्य करण्यात आले. |
| ६६ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur ★

| | |
|---|---|
| | करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये भित्तीचित्र स्पर्धा उत्साहात झाली. रंगचित्राच्या माध्यमातून मनातल्या अनेक भावना विद्यार्थ्यांनी मांडल्या अवयवदान, महिला सुरक्षा, पर्यावरण संरक्षण असे विषय निवडण्यात आले होते. सामाजिक शास्त्रे संकुल परिसर भित्तीचित्रांनी साहून गेला होता या कला प्रकारांमध्ये सर्व विद्यापीठांनी सहभाग नोंदवला होता. |
| ६७ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते वक्तृत्व स्पर्धेसाठी वाणी आणि लेखणी, माझ्या स्वप्नातील भारत, माणूस म्हणून घडताना असे विषय देण्यात आले या स्पर्धा हिंदी, इंग्रजी मराठी भाषेमधून झाल्या. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने माझ्या स्वप्नातील भारत हा विषय मांडला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांनी चंद्रयान मंगलयान, स्त्री देशाची पंतप्रधान आणि राष्ट्रपती होऊ शकते चंद्र आणि भाकरीचा चंद्र यांच्या मधली मार्मिक तुलना शाश्वत विकास आणि भुकेचे प्रश्न अशा अनेक प्रश्नावरती मुद्दे शुद्ध भाषण केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने माणूस म्हणून घडताना या विषयाचे सादरीकरण केले गुरु शिष्याचे बदलते नाते दिल्लीतील श्रद्धा प्रकरण, गरोदर महिलेवर होणारे बलात्कार या विषयावर परखड भाषण केले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने वाणी आणि लेखणी या विषयावर दमदार मत मांडले महाराष्ट्राला पावलेले संत, प्रत्येक क्रांतीचा मेंदू लेखणी आणि कणा वाणी असतो असे भाष्य करत उत्तम सादरीकरण केले. |
| ६८ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" मध्ये पथनाट्य कला प्रकार सादर करण्यात आला. पथनाट्यांनी अंगावर शहारे आणले. विविध सामाजिक प्रश्नावर कठोर भाष्य करणारे सादरीकरण करण्यात आले. स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी, बेरोजगारी, शेतकरी समस्या, भारतीय एकात्मता, पेपर फुटी, भ्रष्टाचार, अत्याचार, हिंदू मुस्लिम वाद, व्यसनाधीनता, पाणी बचाव, खरे हिरो कोण, खैरलांजी प्रश्न, गोध्रा हत्याकांड बिल्कीस बानो प्रकरण, श्रद्धा वालकर प्रकरण, अवयव दान, स्त्री-पुरुष समानता, एकतर्फी प्रेम, उपोषण, जातीय विषमता, भारताची राजकीय परिस्थिती, डिजीटल इंडिया, तीन तलाक, शिक्षणाची दूरावस्था अशा विविध विषयावर पथनाट्याच्या माध्यमातून भाष्य करण्यात आले पथनाट्य या कला प्रकारात सर्व विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. |
| ६९ | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव "उत्कर्ष २०२२-२३" या महात्सवाचे समारोप कार्यक्रम विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या मंचावर दिनांक ०९ |

| | |
|---|---|
| | जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले होते. तरी सदरच्या महोत्सवासाठी जागतिक कीर्तीचे सुंदरी वादक पंडित भीमण्णा जाधव, समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दैनिक सकाळचे संपादक अभय दिवाणजी, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे प्रभारी प्र- कुलगुरू प्रा. डॉ. विकास पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्य ब्रँड अँबेसिडर (सदिच्छा दूत) प्रिया पाटील, कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी श्रेणीक शहा, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, डॉ. एस. एस. गणपुर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गुणवंत सरवदे व उत्कर्ष समन्वयक तथा संचालक विद्यार्थी विकास डॉ. केदारनाथ काळवणे आदींच्या उपस्थितीत संपन्न झाला. |
| ७० | दिनांक २ जानेवारी २०२३ रोजी या स्पर्धेचे उद्घघाटन राज्य शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. विकास चंद्र रस्तोगी यांच्या हस्ते ऑनलाईनव्दारे झाले. त्यानंतरच्या तीन दिवसात निबंध स्पर्धा, लोककला स्पर्धा, संकल्पना नृत्य स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, शोभायात्रा स्पर्धा, इत्यादी स्पर्धा विद्यापीठाच्या परिसरात संपन्न झाल्या महाराष्ट्रातील १३ विद्यापीठामधील राष्ट्रीय सेवा योजनेचे २५० कलावंत या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाने एकंदर २४ समितीची स्थापना केली होती. या सर्व समित्यांनी नेमून दिलेले कामे चोक बजावल्यामुळे हा महोत्सव चांगल्या रीतीने संपन्न झाला. या स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था विद्यापीठ परिसरात करण्यात आली होती. ५ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मान्यवरांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करून सदरच्या महोत्सवाचा समारोप करण्यात आला. राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतपदाचे प्रथम पारितोषिक संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, व्दितीय सर्वसाधारण विजेता विद्यापीठ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी पटकाविला आहे. |
| मनोगत / प्रतिक्रिया | दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव “उत्कर्ष २०२२-२३” या महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या संघातील स्वयंसेवक / स्वयंसेविका व संघनायकांनी उत्कर्ष महोत्सवाच्या आयोजनाबाबत खालीलप्रमाणे आपले मत मांडले.<br>१. प्राध्यापक स्वप्निल चौरागडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ संघाचे संघप्रमुख यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ मध्ये येऊन खूपच चांगले वाटले. मागे आम्ही जेव्हा उत्कर्षासाठी कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे गेलो होतो त्याही विद्यापीठाच्या पद्धती तिनेच इथेही चांगली व्यवस्था करण्यात आली आहे. येथील सर्वच लोक खूप |

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

चांगले आहेत या ठिकाणी जे काम चालत आहे ते अतिशय सिस्टिमॅटिक पद्धतीने चालत आहे मुलांसाठी व मुलींसाठी राहण्याची चांगली सोय आहे त्यांना विद्यापीठात सकारात्मक ऊर्जेचा अनुभव आल्याचे त्यांनी मत मांडले.

२. प्राध्यापक कैवल्य रुद्रे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संघप्रमुख यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे प्रथमच आलो आहे आम्हाला खूप छान वाटले अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

३. डॉ. प्रदीप औजेकर, कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या विद्यापीठाचे संघनायक यांनी विद्यापीठाचा परिसर अतिशय रम्य आहे अशी भावना व्यक्त केली.

४. अरबाज शेख, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली या विद्यापीठातील सहभागी स्वयंसेवकांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कॅम्पस खूप छान आहे तेथे उत्कर्ष महोत्सवासाठीचे व्यवस्थापन खूप छान प्रकारे झाले आहे या विद्यापीठात प्रथमच आलो असल्याने खूप छान वाटले अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

५. डॉ. अमित गोगावले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघनायक यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कॅम्पस अतिशय छान आहे. खरं तर आम्ही विविध विद्यापीठांमध्ये अगोदर गेलोय पण इथं निवास व्यवस्था पाहणाऱ्या अंजना लावंड मॅम होत्या त्याने रात्री ११ ते १२ वाजेपर्यंत आमची विचारपूस केली गेटपासून आतपर्यंत म्हणजे रूम पर्यंत सोडण्याची अतिशय उत्तम व्यवस्था त्यांनी केली. आम्हांला खूप छान वाटलं विद्यापीठाचा पाहुणचार खूपच उत्तम होता अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

६. एचएसएनसी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठातील काही विद्यार्थ्यांनी अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची कॅम्पस अतिशय सुंदर निसर्गरम्य आणि हिरवळ युक्त आहे आणि इथे आल्यापासून ते आतापर्यंतची पूर्ण मॅनेजमेंट आम्हाला खूप आवडली. यंदा उत्कर्षमध्ये आम्ही पहिल्यांदाच सहभाग नोंदवल्यामुळे मनामध्ये धाकधूक आहे पण त्यासोबतच असा आत्मविश्वास देखील आहे की इथून जाताना आम्ही आमच्यासोबत भरपूर अनुभवांचा साठा घेऊन जाऊ. अशा मोठ्या स्पर्धांमध्ये आम्हाला सहभाग नोंदवता आला आणि आम्हाला सोलापूर विद्यापीठांमध्ये आमंत्रित केले यासाठी आम्ही उत्कर्ष आयोजकांचे आभारी आहोत. अशा भावना व्यक्त केल्या.

७. आशुतोष घाटोळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील सहभागी विद्यार्थी यांनी उत्कर्ष मध्ये प्रथमच सहभागी झालो आहे. खूप काही शिकायला मिळतंय अशा भावना व्यक्त केल्या.

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

| | |
|---|---|
| | ८. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील सहभागी विद्यार्थ्यांनी उत्कर्ष २०२२ च्या महोत्सवासाठी आम्ही जयंत तयारी करून आलो आहोत. आम्ही विविध कला प्रकारांमध्ये सहभाग घेतला आहे. आम्ही स्पर्धक म्हणून उत्सुक आहोत या स्पर्धेसाठी कोविड-१९ कालावधीनंतर आम्हाला एकंदरीत सर्व कलावंत विद्यार्थ्यांना उत्कर्ष मध्ये सहभागी होता येणार आहे याचा विशेष आनंद आहे. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने उत्तम असे व्यासपीठ उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्र शासन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राज्यपातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहे याचा समाधान वेगळेच आहे. शासनाचे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे आभारी आहोत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.<br>९. अमरावती विद्यापीठाच्या डॉ. पूजा पानसे, जळगाव विद्यापीठाचे डॉ. प्रदीप अवसेकर, पुणे विद्यापीठाची श्रुती बोरस्ते आणि मुंबईच्या एच एस एन सी विद्यापीठाचा सागर तोलनकर यांनी राहण्याची व्यवस्था व भोजनाची व्यवस्था अतिश्य चांगल्या प्रकारे केली असल्याचा आनंद व्यक्त केला. यावेळी आपले अनुभवही कथन केले. |

**(डॉ. गुणवंत सरवदे)**
**संचालक, रासेयो**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' (CGPA 2.96)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: nss@sus.ac.in विस्तारित क्र.: २२७




**प्रति,**
**मा. डॉ. प्रशांतकुमार वनंजे,**
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी,
रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई

**विषय- सन २०२२-२३ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृत्रिक महोत्सवाच्या अहवालाबाबत.**
**संदर्भ-**महाराष्ट्र शासन पत्र क्र. रासेयो-२०२२/प्र.क्र.१११/साशि-७ दि.०९/०१/२०२३

**महोदय,**

उक्त विषयांस अनुसरून महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्देशित केल्यानुसार दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सन २०२२-२३ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृत्रिक महोत्सवाचा सविस्तर अहवाल व फोटोज पाठवावे असे संदर्भिंय पत्रान्वये आपण या विभागास कळविले होते.

सबब, दि.०२/०१/२०२३ ते दि.०५/०१/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सन २०२२-२३ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृत्रिक महोत्सवाचा सविस्तर अहवाल व निवडक फोटो आपल्या कार्यासनाकडे पाठवित आहोत.

(डॉ. गुणवंत सरवदे)
**संचालक, रासेयो**

| | | | |
|---|---|---|---|
| | NAAC Accredited-2022 'B++' (CGPA 2.96) | NOT ME BUT YOU |  |

Regional Director of NSS Pune,
Ministry of Youth Affairs and Sports,
Government of India &
Department of Higher & Technical Education,
Govt. of Maharashtra,
NATIONAL PRE-REPUBLIC DAY PARADE
STATE LEVEL SELECTION CAMP
Organized by
National Service Scheme, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

Date-27 to 29 September, 2023
Place-Convocation Stage



## राष्ट्रीय सेवा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पुर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीर, सोलापूर (महाराष्ट्र)
## कालावधी- बुधवार दि.२७/०९/२०२३ ते शुक्रवार दि.२९/०९/२०२३
## उदघाटन समारंभ

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, पुणे, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पुर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीर, सोलापूर (महाराष्ट्र) **दि.२७/०९/२०२३ ते शुक्रवार दि.२९/०९/२०२३** या कालावधीत आयोजित केले होते.

बुधवार दि.२७/०९/२०२३ रोजी प्रस्तुत विद्यापीठ सभागृह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या ठिकाणी उद्घाटन समारंभ सकाळी ११:३० वा. मा. प्रा. डॉ. राजनीश कामत, प्रभारी कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली व मा. श्री. अजय शिंदे, क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार तसेच मा. डॉ. रामेश्वर कोठावळे, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरूवात रासेयो गीत व विद्यापीठ गीताने व तद्नंतर अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, संचालक, रासेयो यांनी केले. सर्व विद्यापीठातून आलेल्या स्वयंसेवकांचे व सर्व संघ नायकांचे स्वागत त्यांनी केले. तसेच या विद्यापीठातील वृक्षमय असलेल्या परिसराचा आपण आनंद घ्यावा असे त्यांनी सांगितले. व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्रास्ताविकामध्ये त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे श्री. अजय शिंदे यांनी सदरच्या निवड चाचणी शिबीराबद्दल मार्गदर्शन केले व सदरील निवड चाचणी शिबीराच्या निवडीसाठी परेड हा महत्वाचा मुद्दा असल्याचे मत व्यक्त केले. सहभागी विद्यार्थ्यांना निवडीसाठी शुभेच्छा दिल्या

प्रमुख पाहुणे डॉ. रामेश्वर कोठावळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागातंर्गत राबविण्यात येणा-या विविध उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले व या तीन दिवसीय निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन झाल्याचे जाहिर केले. सहभगी सर्व स्वयंसेवकांना एनआरडी व एसआरडी निवडीसाठी सुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांनी स्वच्छता मोहिम, आपत्ती व्यवस्थापन, विशेष शिबीरे, विविध जनजागृती कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना सतत कार्य करत असल्याचे सांगितले. सदरील निवड चाचणी शिबीरामध्ये सहभागी झालेल्या सर्वांचे स्वागत करून निवड चाचणी शिबीरासाठी शुभेच्छा दिल्या तसेच सदरील शिबीराचा व हरितमय विद्यापीठ परिसराचा आनंद घ्यावा असे ही मत व्यक्त केले. या तीन दिवसाचे नियोजन उत्तम रीतीने केल्याचे त्यांनी कथन केले. तरीही काही उणिवा असल्यास आपण त्या आम्हांस सुचवाव्यात असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. जवाहर मोरे, विभागीय समन्वयक, रासेयो यांनी केले. या कार्यक्रमासाठी मा. श्री. अजय शिंदे, क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, मा. डॉ. रामेश्वर कोठावळे, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण

विभाग, महाराष्ट्र शासन, डॉ. सुशिल शिंदे, प्रा. रमेश देवकर, कॅ. शिल्पा लब्बा, कॅ. भिमाशंकर व्हनमाने आदींच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

सदरच्या उद्घाटन समारंभाचे मा. प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, संचालक, रासेयो व विद्यापीठ स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समिती समन्वयक व सदस्यांनी नियोजन केले.



## National Service Scheme

**Pre Republic Day Parade State Level Selection Camp,**

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

**27th Sept, 2023 to 29th Sept, 2023**

# Programme Schedule

### 27th Sept. 2023

1) Arrival of Volunteers --- Incubation Hall
2) Registration / Collection of documents Uni wise --- Incubation Hall
3) Distribution of Chest No as per Uni wise chart --- Incubation Hall
4) Distribution of Accommodation --- Hostel

| | |
|---|---|
| 6.00 | Assembly in the ground |
| 6.00- 6.30 | Prayer followed by Yoga |
| 6.30- 7.00 | Running |
| 7.30- 8.00 | Tea/ Breakfast |
| 8.00- 10.30 | Parade Practice/ Registration/ Document Submission/ Distribution of Chest No. |
| 11.00 | Assembly in the Auditorium |
| 11.30-13.00 | Camp Briefing & Inaugural Function |
| 13.00-14.00 | Lunch |
| 14.00-16.00 | Physical Measurement / Parade Practice/Interviews |
| 16.00-16.15 | Tea Break |
| 16.15-18.00 | Physical Measurement / Parade Practice/Interviews |
| 18.20 | Assembly in the Auditorium |
| 18.30-20.00 | Cultural Programme –Short Performance by participants |
| 20.00-21.00 | Dinner |
| 21.30 | Lights off |

### 28th Sept. 2023

| | |
|---|---|
| 6.00 | Assembly in the ground |
| 6.00- 6.30 | Prayer followed by Yoga |
| 6.30- 7.00 | Running |
| 7.30- 8.00 | Tea/ Breakfast |
| 8.30- 13.00 | Selection/ Parade Practice/ Interviews |
| 13.00-14.00 | Lunch |
| 14.00-16.00 | Selection/ Parade Practice |
| 16.00-16.15 | Tea Break |
| 16.15-18.00 | Selection/ Parade Practice/Interviews |
| 18.20 | Assembly in the Auditorium |
| 18.30-20.00 | Cultural Programme- Short Performance by participants |
| 20.00-21.00 | Dinner |
| 21.30 | Lights off |

### 29th Sept. 2023

| | |
|---|---|
| 6.00 | Assembly |
| 6.00- 6.30 | Prayer followed by Yoga |
| 6.30- 7.00 | Running |
| 7.30- 8.00 | Tea/ Breakfast |
| 8.00- 11.00 | Selection/ Parade Practice |
| 11.00-11.30 | Break |
| 11.30 | Assembly in the Auditorium |
| 12.00-13.00 | Valedictory |
| 13.00-14.00 | Lunch |

**After the arrival of participants at the Camp site i.e. on 26th Evening or 27th morning-particpants will have to register themselves, submit Nomination form to the organizers & collect the chest No.**

1. Medical Assistance : Dr. Abhijit Jagtap ( 9730105931)
2. Registration : Dr. Vinayak Dhulap (7588384576)
3. Document Verification : Shri. Mahesh Koli (9850564865)
4. Accommodation for Girls : Smt. Rajashri Akkalkote ( 9022093368)
5. Accommodation for Boys : Dr. Uttam Kamble ( 9075401507)

**Prof. Dr. Rajendra Wadje**
Director, N.S.S.
Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur

**Yogini Ghare**
Registrar
Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur







सिलेक्शन कॅम्पसाठी आलेल्या स्वयंसेवकांचे नोंदणी दि.२७/०९/२०२३






सिलेक्शन कॅम्पसाठी आलेल्या स्वयंसेवक यांची उंची व वजन मोजणी दि.२८/०९/२०२३







सिलेक्शान कॅम्पसाठी आलेल्या स्वयंसेवक यांची उंची व वजन मोजणी दि.२८/०९/२०२३






सदरच्या निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन दि.२७/०९/२०२३






निवड चाचणी शिबीर परेड सादरीकरण दि.२८/०९/२०२३





योगा







सहभागी संघ व्यवस्थापक, प्रमुख पाहुणे व परिक्षक


उद्घाटन समारंभ
201


प्रा. डॉ. राजनीश कामत
(मा. प्रभारी कुलगुरु, पु. अ. हो. सो. वि. सो.)
प्रमुख पाहुणे
श्री. अजय बा. शिंदे
डॉ. रामेश्वर कोठा
मा. राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महार
योगिनी घारे
18






सांस्कृतिक सादरीकरण व सहभागी स्वयंसेवक

**समारोप समारंभ**

**शुक्रवार दि.२९/०९/२०२३ सकाळी ११:३० वा.**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या वतीने राज्यसतरीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवड चाचणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठ प्रशासनाने योग्य नियोजन करत निवड प्रक्रिया शिबीर मोठया उत्साहात पार पाडली.

या समारोप समारंभात बोलताना प्रमख पाहुणे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. रामेश्वर कोठावळे यांनी विद्यापीठाच्या वतीने केलेल्या सर्वांगीण नियोजनाचा आणि आयोजनाचा आढावा घेत विद्यापीठ प्रशासनाचे कौतुक करत धन्यवाद दिले.

भारत सरकारच्या युवा व कार्य मंत्रालयाचे क्षेत्रीय संचालक, श्री. अजय शिंदे यांनी महाराष्ट्र राज्यातील विविध कोप-यातून आणि विद्यापीठातून आलेल्या सर्व स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, संघ नायक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि नियोजन कमिटीला यशस्वी नियोजनाबद्दल धन्यवाद दिले.

सदरचा समारोप समारंभ प्रा. डॉ. गौतम कांबळे, प्र.कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.